| MHKO140001752025 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९/२०२५**<br>श्री. नारायण सातेरी सुतार आणि वगैरे.३<br>**विरुद्ध**<br>कोणीही नाही. |
|---|---|

## <u>निशानी क्रमांक ०१ वरील आदेश</u>

## (दिनांक २१/०४/२०२६)

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज, वारस प्रमाणपत्र मिळणे करीता, मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ चे कलम (३) अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे सख्खे भाऊ-बहिण असून त्यांचे वडिल व अर्जदार नं.४ हिचे चुलत भाऊ सातेरी भिकू सुतार हे दिनांक १२/१०/२०२१ रोजी मौजे दिंडलकोप, ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथे मयत झालेले आहेत. तसेच द्रौपदी देमानी सुतार या दिनांक ०३/०५/२०१५ रोजी मयत झालेली आहे. सातेरी भिकू सुतार यांचे पश्चात अर्जदार क्र.१ ते ३ व अर्जदार नं.४ मयत द्रौपदी देमानी सुतार यांना सरळ वारस ४अ) पार्वती शिवाजी सुतार हेच कायदेशीर वारस आहेत. त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयत यांचे पश्चात त्यांचे मौजे दिंडलकोप, ता. चंदगड येथे शेतजमिन व घर मिळकत अशा मिळकती असून सदरच्या मिळकती या सातेरी भिकू सुतार यांचे नावे नोंद होत्या. मयत यांची शेतजमिन महाराष्ट्र शासनाने दिंडलकोप तलाव प्रकल्पासाठी संपादित केलेली आहे. त्याकामी माननीय दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, गडहिंग्लज यांच्यासमोर लॅण्ड रेफरन्स नं.१५/२०२२ व ३८/२०१६ तडजोडीने निकाली काढण्यात आलेला असून त्यामध्ये नुकसान भरपाई रक्कम रु.५७,७२७/- आणि रु.१,००,९४६/- देणेबाबतचा आदेश झालेला आहे. सदर रक्कम मिळणेसाठी अर्जदार यांना मयत सातेरी भिकू सुतार यांचे वारस असलेबाबत प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रकरणामध्ये दि.१२/११/२०२५ रोजीच्या '' दैनिक तरुण भारत'' मध्ये जाहीर प्रगटन करण्यात आले. कायदयाच्या तरतुदीप्रमाणे, जाहीरनामा नि.क्र.१० प्रमाणे बजावण्यात आला. प्रस्तुत प्रकरणामध्ये, अर्जदाराच्या मागणीस, कोणीही हरकत घेतलेली नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे सुविद्य विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जदार क्र.१ नारायण सातेरी सुतार यांनी त्यांचे पुरावा प्रतिज्ञालेख दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञालेखामध्ये नमुद केलेला मजकुर अर्जदाराच्या अर्जातील कथनास पुष्टी देणारा आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, ते मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार यांना नुकसान भरपाई रक्कम रु.५७,७२७/- आणि रु.१,००,९४६/- देणेबाबतचा आदेश झालेला आहे. सदर रक्कम मिळणेसाठी अर्जदार यांना मयत सातेरी भिकू सुतार यांचे वारस असलेबाबत प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.

६. अर्जदाराने कागदोपत्रीपुरावा म्हणून मयत सातेरी भिकू सुतार आणि द्रौपदी देमानी सुतार यांच्या मृत्यूची मुळ प्रमाणपत्रे नि.क्र.२७ व नि.क्र.२८ वर दाखल केलेले आहे. तसेच रहिवाशी स्वयंघोषणापत्र निशाणी क्र.२९ खाली दाखल केले आहे. अर्जदार यांचे अधारकार्डची पडताळणी केलेल्या प्रती निशाणी क्र.२३ ते निशाणी क्र.२६ खाली दाखल केले आहेत. अर्जदाराने पुरावा बंद पुरसीस नि.क्र.१५ खाली दाखल केलेली आहे. निशाणी क्र.१३ प्रमाणे दि.१२/११/२०२५ रोजीच्या '' दैनिक तरुण भारत'' वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस दाखल केली आहे.

७. जाहीरनामा व अर्ज नियमाप्रमाणे, मयताच्या घराच्या समोरील बाजूस लावण्यात आले, जाहीरनामा व अर्जाची एक प्रत ग्रामपंचायत नोटीस बोर्ड वर लावण्यात आली व मुनादीने जाहीर केले. एक प्रत न्यायालयाच्या नोटीस फलकावर लावण्यात आली. उपरोक्त पध्दतीने, जाहीरनामा बजावुन व जाहीर प्रगटन करुन देखील अद्याप कोणीही सदर अर्जास हरकत घेतलेली नाही.

८. अर्जदाराच्या अर्जास मुदतीच्या आत कोणीही हरकत नोंदवली नाही. तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडिल सातेरी भिकू सुतार हे दिनांक १२/१०/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ हे सदर सातेरी भिकू सुतार यांचे वारस असल्याचे सिध्द होते. तसेच दाखल दस्तावरुन असे दिसून येते की, द्रौपदी देमानी सुतार यांचा मृत्यू दिनांक ०३/०५/२०१५ रोजी झालेला आहे. सबब. अर्जदार क्र.४अ ह्या मयत द्रौपदी देमाना सुतार यांच्या वारस असल्याचे सिध्द होते. सबब. मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत **सातेरी भिकू सुतार** यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत, आणि अर्जदार क्र.४अ हे मयत **द्रौपदी देमानी सुतार** यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत, मुंबई रेग्युलेशन अधिनियमचे 'परिशिस्ट ब'' मध्ये विहित नमुन्यामध्ये वारस प्रमाणपत्र आवश्यक न्यायालयीन शुल्क स्वीकारुन देण्यांत यावे.

३. दिवाणी नियमावली **परिच्छेद क्र.३१२** नुसार चे टिपणी टाकून वारस प्रमाणपत्र देण्यांत यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2026.04.21 15:53:21 +0530

**दिनांक–२१/०४/२०२६** **(वामन दि. जाधव)**

**ठिकाणः–चंदगड.** **सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, चंदगड.**